# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२ ०६०१, २२६९ ०६०२, २२६४ ११५०/५१, फॅक्स - २२६९ २१०२.
तार - EDUTECH E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dte.org.in


क्रमांकः२अ/एडीएम/२००८/१८८५
दिनांक : १८.०७.२००८

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर

विषय : शैक्षणिक वर्ष २००८-०९ मध्ये व्यावसायिक अभ्यासक्रम मागासवर्गीय उमेदवारांना शुल्क माफी देण्याबाबत....

संदर्भ : १) शासन निर्णय आदिवासी विकास विभाग क्रमांक व्यअप्र-२००८/ प्र.क्र.११५/ का १२, दिनांक ९.७.२००८
२) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक इबीसी-२००८/प्र.क्र.१३८ /मावक-२, दिनांक १७.७.२००८
३) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक इमाव-२००७/प्र.क्र.१५०/मावक-३, दिनांक १७.७.२००८

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतून प्रवेश घेणा-या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपूर्तीचे धोरण शैक्षणिक वर्ष २००८-०९ मध्ये प्रथम वर्षात प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना ते त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करेपर्यंत लागू राहतील असे आदेश संदर्भाधीन शासन निर्णयान्वये निर्गमित केलेले आहेत. (सदर शासन निर्णय संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे)

तसेच उपरोक्तनुसार अनुसूचित जाती, वि जा (अ),भज(ब),भज(क),भज (ड), विमाव या प्रवर्गांनाही १०० टक्के शैक्षणिक शुल्क माफी असून इमाव प्रवर्गास ५०टक्के शुल्क माफी देण्यात यावी.

व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश देताना इतर मागासवर्गीय उमेदवार वगळता मागासवर्गीय उमेदवारांकडून कोणतेही शिक्षण शुल्क आकारण्यात येऊ नये. इतर मागासवर्गीय उमेदवारांकडून ५०टक्के शुल्क आकारण्यात यावे व ही बाब आपल्या अधिनस्त सर्व संस्थांना कळविण्यात यावी.

तसेच महाराष्ट्र राज्यातील अल्पसंख्यांकासाठी चालविण्यात येणा-या शैक्षणिक संस्थांना धार्मिक/भाषिक अल्पसंख्याक संस्था म्हणून दर्जाची मान्यता देण्यासाठी कार्यपध्दीत, अटी व शर्ती विहीत करण्याबाबत शासन निर्णय अल्पसंख्यांक विकास विभाग क्रमांक अशैसं-२००८/प्रक्र१३३/२००८/का.१, दिनांक ४.७.२००८ अन्वये तरतूदी निर्गमित केलेल्या आहेत. सदर शासन निर्णयाची प्रत सोबत जोडण्यात आलेली आहे. आपल्या अधिनस्त असलेल्या अल्पसंख्यांक दर्जाच्या संस्थांच्या अनुषंगाने सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( डॉ.एस के महाजन)

प्र.संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

D:\Rajesh\Admission 08-09\fee concession for backword candidates.doc